मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांच्या आदेशानुसार पदस्थापनेमध्ये सुधारणा करणेबाबत.
डॉ.राहुल चिंतामण शेंदरे व डॉ.माधवी आनंद गोगले, पशुधन विकास अधिकारी (गट-अ)

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन आदेश क्रमांक पसंप्र-२०१७/प्र.क्र.२४८/पदुम-१
५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- २९नोव्हेंबर, २०१७

वाचा :- शासन आदेश क्र.पसंप्र-२०१६/प्र.क्र.३४५/पदुम-१, दि.३१.०५.२०१७

शासन आदेश :-

डॉ.राहुल चिंतामण शेंदरे व डॉ.माधवी आनंद गोगले, पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांनी त्यांच्या बदलीसंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेला मुळ अर्ज क्र.७५७/२०१७ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दि. ४.१०.२०१७ रोजी न्यायनिर्णय पारित करुन डॉ.शेंदरे व डॉ.गोगले यांनी शासनाकडे दिलेल्या निवेदनावर दोन महिन्यामध्ये निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत. मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार डॉ.शेंदरे व डॉ.गोगले यांच्या निवेदनाचा शासन स्तरावर विचार करण्यात आला असून विचारांती, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदी नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने डॉ.शेंदरे व डॉ.गोगले पशुधन विकास अधिकारी(गट-अ) यांच्या बदलीबाबत दि.३१.५.२०१७ च्या शासन आदेशामध्ये अंशत: बदल करुन आता त्यांची सुधारीत पदस्थापना खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद ठिकाणी करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	मा.न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३
१.	डॉ.राहुल चिंतामण शेंदरे, पशुधन विकास अधिकारी, चारगांव(बु) ता.वरोरा, जि. चंद्रपूर	पवैद श्रेणी-१, खेमजई, ता. वरोरा, जि. चंद्रपूर (डॉ.डी.जे.मेश्राम यांच्या पदस्थापनेमध्ये सुधारणा केल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर)
२	डॉ.माधवी आनंद गोगले, पशुधन विकास अधिकारी, शेगांव(बु) ता.वरोरा, जि. चंद्रपूर	पवैद श्रेणी-१, चारगांव (बु), ता. वरोरा, जि. चंद्रपूर (डॉ.राहुल शेंदरे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)

२. संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी पर्यायी व्यवस्था करुन डॉ.शेंदरे व डॉ.गोगले यांना कार्यरत पदावरुन तातडीने कार्यमुक्त करावे. तसेच डॉ.शेंदरे व डॉ.गोगले यांनी वरीलप्रमाणे पदस्थापनेच्या पदावर विनाविलंब रुजू व्हावे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७११२९१११११३८७७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2017.11.29 11:14:21 +05'30'

(वि.सो.मेंढे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-०७.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली/चंद्रपूर
३. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे.
४. मुख्य सादरकर्ता अधिकारी, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ नागपूर.
५. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर
६. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, गडचिरोली/चंद्रपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली/चंद्रपूर
८. संबंधित पशुधन विकास अधिकारी द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, म.रा.पुणे.
९. निवड नस्ती.